**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २७ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशात क्रीडा विद्यापीठांपासून ते आधुनिक प्रशिक्षणकेंद्रांपर्यंत व्यापक क्रीडा परिसंस्था विकसित केली जात असल्याचं पंतप्रधानांच खेलो इंडिया संवादात प्रतिपादन; राज्यभरात संवादाच थेट प्रक्षेपण.**
2. **पंचायत समिती जिल्हा परिषदांमध्ये नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीसाठी नियम निश्चित विविध क्षेत्रांतील अनुभवी तज्ज्ञ व्यक्तींना मिळणार प्रतिनिधित्व; ग्रामविकास विभागामार्फत अध्यादेश जारी.**
3. **अमरावती येथील तीन नवजात बालकांचा मृत्यूच्या दुर्घटनेची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने घेतली स्वतःहून दखल; 2 आठवड्यांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे मुख्य सचिवांना निर्देश.**
4. **सोनल दिनुशाच्या नाबाद शतकामुळे श्रीलंकेचा भारताविरुद्ध दुसरा कसोटी सामना अनिर्णित; भारताने मालिका एक-शून्यने जिंकली.**

----------------------------------------

खेलो इंडिया संवाद

देशातल्या प्रतिभेला प्रत्येक टप्प्यावर पाठिंबा मिळेल अशा क्रीडा विद्यापीठांपासून ते आधुनिक प्रशिक्षण केंद्रांपर्यंत क्रीडा परिसंस्था विकसित केली जात असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. खेलो इंडिया संवाद या कार्यक्रमाला ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते. खेळ हे केवळ पदक जिंकण्यापुरते मर्यादित नसून उत्तम व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मार्ग असल्याचंही पंतप्रधान यावेळी म्हणाले. ऑलम्पिक मध्ये अर्ध्यापेक्षा जास्त प्रकारामध्ये भारताचे प्रतिनिधीत्वच नसते. हे चित्र बदलण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशा खेळांची परिसंस्था निर्माण होणे आवश्यक आहे यासाठी खेलो इंडिया संवाद सारखे कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरतात असे पंतप्रधान म्हणाले....

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 24 सेकंद)***

फिट इंडिया मूव्हमेंट, संडे ऑन सायकल सारख्या उपक्रमांमुळे नागरिक आता सुदृढ आणि निरोगी जीवनशैलीला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे भारताची क्रीडा परिसंस्था

आता पायाभूत सुविधा आणि पदकांच्या पलिकडे जात असल्याचं केंद्रीय क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्री मनसुख मांडवीय म्हणाले. खेलो इंडिया संवाद हा कार्यक्रम राष्ट्रीय क्रीडा दिन २०२६च्या उत्सवाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या दोन महाविद्यालयांमधले तरुण सहभागी झाले होते. एम्स नागपूर येथे खेलो इंडिया संवादांतर्गत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रामुख्याने उपस्थित होते त्यांनी या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या खेळाडूंचा सत्कार केला. या कार्यक्रमानंतर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा आणि खेळ महत्त्वाचे असून, त्यातूनच सर्वांगीण विकास होतो असा संदेश पंतप्रधानाच्या संबोधनातून मिळाल्याच सांगितल.

***(होल्ड बाईट- एम्स विद्यार्थी 12 सेकंद)***

याप्रसंगी राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेत कामगिरी करणारे खेळाडू मल्हार साबळे यांनी खेळाडूंना ड्रग्ज पासून दूर राहण्याचा सल्ला दिला. आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू अरुंधती पानतावणे यांनी नागपुरातील लेडी अमृत बाई डागा एलऐडी कॉलेज येथील 'खेलो इंडिया संवाद' कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमात नागपूरच्या महापौर नेता ठाकरे स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी आणि महाविद्यालयातील विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते. ‘खेलो इंडिया संवाद’मध्ये गोंदीयाच्या अर्जुनी मोरगाव येथील शिवप्रसाद सदानंद जैस्वाल महाविद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गडचिरोलीच्या अहेरी येथील राजे धर्मराव विज्ञान महाविद्यालयात 'खेलो इंडिया संवाद' कार्यक्रम पार पडला. वाशिममध्ये या कार्यक्रमाचे आयोजन आर.ए. महाविद्यालय, येथे करण्यात आले.

---------------------------------------------

नामनिर्देशित सदस्यांची पात्रता अध्यादेश

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अंतर्गत पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांमध्ये नामनिर्देशित सदस्यांची पात्रता आणि नियुक्तीची प्रक्रिया निश्चित केली आहे. यासंदर्भात ग्रामविकास विभागाने अध्यादेश जारी केला आहे.या नियमांनुसार पंचायत समितीमध्ये एकूण निर्वाचित सदस्यसंख्येच्या २० टक्के किंवा किमान एक, यापैकी जी संख्या अधिक असेल, तेवढे नामनिर्देशित सदस्य असतील. जिल्हा परिषदेत एकूण निर्वाचित

सदस्यसंख्येच्या १० टक्के किंवा किमान पाच, यापैकी जी संख्या अधिक असेल, तेवढे सदस्य नामनिर्देशित केले जातील. नामनिर्देशनासाठी संबंधित क्षेत्राचा रहिवासी असणे आणि पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद प्रशासनाचे विशेष ज्ञान अथवा कार्यानुभव असणे आवश्यक आहे. वैद्यकीय, शिक्षण, कृषी, जलसंधारण, सहकार, ग्रामीण विकास, महिला व बाल विकास, कला, साहित्य, समाजकार्य, अभियांत्रिकी आणि विधी क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचाही विचार केला जाणार आहे. तसेच दीर्घकाळ शासनसेवा केलेले सेवानिवृत्त अधिकारी आणि सामाजिक कल्याण क्षेत्रात कार्यरत अनुभवी अशासकीय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनाही पात्रता राहणार आहे.दरम्यान, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, ज्या ठिकाणी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची विद्यमान बॉडी आहे, त्या ठिकाणी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या समन्वयाने नामनिर्देशनाची प्रक्रिया गतिमान पद्धतीने राबविण्यात येईल. येत्या एक ते दीड महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण करून नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

---

नेपाळ मदत

नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १७७ वर पोहोचली आहे. आणखी हजारो बेपत्ता असून त्यात सुमारे तीनशे भारतीय पर्यटकांसह इतर परदेशी नागरिकांचा समावेश असल्याची माहिती नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी आज दिली. महापुराच्या पार्श्वभूमीवर भारतानं सुमारे साडे सदतीस टन मदत सामग्री आज नेपाळकडे रवाना केली. पूरग्रस्त भागात अडकलेल्या भारतीय नागरिकांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी तातडीचे प्रयत्न सुरु असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस.जयशंकर यांनी सांगितलं. दरम्यान नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या पर्यटकांचा शोध घेण्यासाठी राज्यशासन केंद्र सरकारच्या संपर्कात असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. ते आज नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातून नेपाळ, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्यांची माहिती संकलित करावी असं सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सांगितलं असून, आपत्ती व्यवस्थापन विभागानं मदत दूरध्वनी क्रमांक जारी केले आहेत. १-०-७-० हा क्रमांक मंत्रालयातल्या नियंत्रण कक्षात २४ तास कार्यरत राहील. राज्यातल्या ४५ प्रवाशांचे दोन गट बसने नेपाळला गेले असून त्यांच्याशी संपर्काचा प्रयत्न सुरु आहे, असं महाजन यांनी सांगितलं. त्याखेरीज आणखी काही पर्यटकांशी संपर्क झाला असून ते सुखरूप असल्याचं समजलं आहे.

-----------------------------------------

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग

महाराष्ट्रात अमरावती इथं रुग्णालयाला आग लागून तीन अर्भकांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोग  NHRC ने स्वतःहून घेतली असून, राज्याच्या मुख्य सचिवांना नोटीस जारी केली आहे. या दुर्घटनेबद्दलचा अहवाल येत्या दोन आठवड्यात सादर करायला आयोगानं सांगितलं असून, त्यात दुर्घटनेत जखमी झालेल्या बालकांची स्थिती आणि बाधित कुटुंबांना जाहीर झालेल्या अर्थसहाय्याचं वाटप याबाबतचा तपशीलही मागितला आहे. NHRC च्या नोटीसमुळे आता राज्य सरकारला घटनेबाबतची वस्तुस्थिती, जखमी बालकांची प्रकृती आणि पीडित कुटुंबांना जाहीर केलेल्या भरपाईबाबतची माहिती आयोगासमोर सादर करावी लागणार आहे. अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील २४ ऑगस्ट रोजी पहाटे  बालकांच्या अतिदक्षता विभागात आगीच्या दुर्दैवी घटनेत ३ नवजात बालकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान  अमरावती जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापनांचे अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (Fire Audit) व आग प्रतिबंधक सराव (Fire drill) एक महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

-----------------------------------------

क्रिकेट

श्रीलंकेचा युवा  खेळाडू सोनल  दिनुशाच्या  नाबाद  133 धावांच्या  झुंजार  खेळीच्या जोरावर श्रीलंकेने कोलंबो इथं झालेल्या भारत आणि श्रीलंकेदरम्यानच्या दुसऱ्या कसोटी सामना अनिर्णित राखला.या मालिकेतलं त्याचं हे तिसरं शतक ठरलं. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत तीन शतकं करणारा तो अरविंदा डिसिल्व्हा आणि कुमार संगकारानंतरचा श्रीलंकेचा तिसरा फलंदाज ठरला आहे. फॉलोऑननंतर श्रीलंकेने 9 बाद 429 धावांवर डाव घोषित केला; भारताने पहिल्या डावात 9 बाद 503 धावांवर डाव घोषित केला होता. भारताकडून मानव सुथार आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी तीन बळी घेतले; दोन सामन्यांची मालिका भारताने 1-0 अशी जिंकली.

-----------------------------------------

अनिल देशमुख

MPSC तसेच इतर शासकीय परीक्षांमधील पेपरफुटी, वाढती महागाई, बेरोजगारी आणि सक्तीच्या स्मार्ट मीटरविरोधात राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या शरद पवार गटातर्फे

नागपुरात भव्य बाईक मोर्चा काढण्यात आला. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संविधान चौकातून निघालेल्या मोर्चात अनिल देशमुख यांनी स्वतः बाईक चालवत मोर्चाचे नेतृत्व केले. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी सरकारवर टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबत सध्या कोणतीही चर्चा सुरू नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तत्पूर्वी MPSC परीक्षांमधील कथित पेपरफुटीला सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप जबाबदार असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी  नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. MPSCच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्याव्यात तसेच वर्ग-३ व वर्ग-४ भरतीची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. आयोगाच्या कारभारात पारदर्शकता न राहिल्यास लाखो तरुणांचा विश्वास डळमळीत होईल, असा इशारा वडेट्टीवार यांनी दिला.

----------------------------------------

हवामान

हवामान !नागपूरच्या  प्रादेशिक हवामान केंद्राने आगामी काही तासांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या दरम्यान नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, गडचिरोली जिल्ह्यात एक-दोन ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची  शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केलं आहे. दरम्यान आज भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यात सर्वत्र तर नागपूर, वर्धा, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली  गोंदिया या जिल्ह्यांमध्ये  तुरळक ठिकाणी पावसाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामाना विभागाने दिला आहे, तर उद्या नागपूर निवर्धा जिल्ह्यात सर्वत्र पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

----------------------------------------